साम्ययोग : दैनिक पुरवणी

# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक : ६१] सेवाग्राम, सोमवार ता. १८ मे १९६४ [मूल्य ५ न. पै.

## काम आणि अर्थ धर्मानेच प्राप्त होतील

[ विनोबा ]

आज विरूळ गावात विनोबांचा पडाव होता. वर्धा जिल्ह्यातील फार मोठे गाव. २७०० तेथील लोकसंख्या, सुपिक जमीन, शिकलेले लोक, वजनदार संपन्न पुढारी. सर्वच काही आगळे होते. ह्या गावात स्व. बाबासाहेब देशमुख होऊन गेले. ते बारा वर्षे प्रांतिक कॉंग्रेसचे उपाध्यक्ष व तीन वर्षे प्रांतिक कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. त्यामुळे प्रथमपासूनच गावात जागृति व कार्यकर्त्यांचे मोहोळ. विनोबावर स्व. बाबासाहेबांचा विशेष अनुग्रह. त्यामुळे विनोबांची भावगंगा व सरस्वति ह्या दुथडी वाहू लागल्या. त्यामुळे त्यांचे आजचे भाषेण आप्तेष्टाशी जिव्हाळचाचा संवाद करावा, लढाईच्या चक्रव्यूहात आपल्या सहकाऱ्याशी सल्लामसलत करावी व आपल्या प्रेमी जनांना गजेंद्रासारखी हाक मारावी, अशा स्वरुपाचे झाले. हया गावात सुमनताई बंग, नंदलाल काबरा, श्री. शेंदुर्णीकर वकील व श्री. रा. कृ. पाटील हयांनी ग्रामदानाची उत्तम भूमिका तयार केलेली होती. आजच्या पडावावर विनोबांना हया भागातील आठ गावांची ग्रामदान पत्रे सादर करण्यात आली. खैरी, एकबूर्जी, हमदापूर ही नवीन गावे होती व हुसेनपुर लालखेडा, रामपोळ, बारह, चिटकी ही गावे पूर्वीच जाहीर झाली आहेत. तेव्हा विनोबांनी केलेल्या हया भाषणाला एक विशेष पार्श्वभूमि होती. विनोबांनी भावमधूर, पुरुषार्थ प्रवण व अंतःकरणाला पीळ पाडणारे खालील भाषण दिले. –सं.

खरे म्हणजे या गावात ग्रामदानाचा विचार मी येऊन समजाऊन सांगायचा याची गरज नाही. बाहेरच्या माणसाने येऊन ग्रामदानाचा विचार समजावणे म्हणजे देशातून कोंकणात मीठ विकत आणण्यासारखे आहे. मीठ कोंकणातच होते आणि ते देशातून कोंकणात आणावचे. ग्रामदानाचा विचार, दिसते की या दहा बारा वर्षात निघाला पण यासंबंधी आमची कितीतरी चर्चा बाबासाहेब देशमुखाशी झाली आहे. स्वराज्य प्राप्तीनंतर काय काम करावे लागेल याची चर्चा बाबासाहेबाबरोबर अनेक वेळा झाली आहे.

### भूमिवाटपाची कल्पना ३२ साल पासून

बाबासाहेबांचा आणि माझा परिचय प्रथम १९२३ साली झाला. नागपूरला झेंडा सत्याग्रह झाला तेव्हा जेलमध्ये आमची भेट झाली. त्यानंतर जेव्हा जेव्हा ते वर्धेला येत तेव्हा मला भेटायला येत असत. ते एक उत्तम शेतकरी होते आणि राजनीतिज्ञ होते पण सर्वात मोठी गोष्ट ही की त्यांच्या हृदयात आध्यात्मिक प्रेरणा होती. त्यावेळेला आम्ही गीता, उपनिषद, ब्रह्मसूत्रांची चर्चा आश्रमात करीत असू. आमच्यापाशी कांही विद्यार्थी होते. त्यांना मी हे तीन ग्रंथ समजावून सांगे. बाबासाहेबही मधून मधून आश्रमात ती चर्चा ऐकायला येत असत. पुढे त्यांना त्याची इतकी गोडी लागली को ते त्यासाठी आश्रमात येऊन राहीले. कांही महिने ते आश्रमात होते जेवण खाण आश्रमात होत असे. चोवीस तास आम्ही एकत्र होतो. प्रत्येक चळवळीत त्यानी भाग घेतला १९४० ची चळवळ आणि अगदी शेवटी ४२ ची चळवळ जमनालालजी वारले आणि "क्वीट इंडिया" "भारत सोडा" हे आंदोलन गांधीजीनी सुरू केले तेव्हाहि ते जेलमध्ये गेले. पुढे आम्हाला मद्रासच्या जेलमध्ये घेऊन गेले तेव्हा ते इकडेच राहीले त्यानंतर त्यांची माझी भेट झाली नाही. ४३ साली मी वेरूळ जेलमध्ये गेलो. ते इकडेच राहीले. त्यांची तब्येत चांगली राहीली नाही नंतर ते सुटले व त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

### स्व. बाबासाहेब विरूळकरांच्या स्मृतीने विनोबांना गहिवरून आले

शेवटच्या जेलमध्ये आम्ही काही दिवस एकत्र होतो. तेव्हा ते मौन घेऊन हिंडत असत बाकी सर्व चर्चा करतांना सापडायचे. पण ते एकटेच हिंडत असायचे तेव्हा एक दिवस मी त्यांना विचारले, "तुम्ही असे मौन घेऊन हिंडत असता तर तुमचे काही चिंतन होत असावे? तुम्ही काय चिंतन करतां" (अश्रू) ते म्हणाले की मी हे चिंतन करतो की मी देह नाही मी देहापासून निराळा आहे. देहभिन्न निखळ, परिशुद्ध आत्मा आहे. असे मी ध्यान करीत असतो. आणि तेच माझे चिंतन चालते. मग त्यांनी एक गोष्ट सांगितली की, खायची वेळ आली की माझे कांही चालत नाही. त्यांना एक संवय होती. ते जरूरीपेक्षा जास्त खात असत. आणि नंतर ओकून टाकीत असत. त्यांचा माझा चांगला परिचय होता म्हणून मी विनोदाने त्यांना म्हटले की, बाबासाहेब लढाईचे पुष्कळ प्रयोग शिकला–दंडपट्टा, लाठी, तलवार सर्व शिकला आणि ऐन लढाईच्या वेळी मनुष्य ते विसरला तर त्याचा काय उपयोग तेव्हा. दिवसभर मी देहापासून अलग आहे असे तुमचे चिंतन चालते. आणि खाण्याचे वेळेस ते विसरता. मग मी त्यांना एक गुजराती म्हण सांगितली, "माणसंनीपरिक्षा खाटले ने पाटले" मनुष्याच्या ज्ञानाची परीक्षा केव्हा होते? जेव्हा आजारी पडून खाटेवर निजतो तेव्हा. जेव्हा तो चिडू लागतो तेव्हा होते आणि पाटले म्हणजे जेवायला बसला की मग परीक्षा होते. तो अन्नात किती मग्न होतो अन्नाला रूचि नसली तर किती चिडतो यावरून त्याच्या ज्ञानाची परीक्षा होते. असे मी सांगितले आणि त्याच्या दुसऱ्या दिवसापासून बाबासाहेबानी सांगितले की आता मी दुप्पट खायचे सोडून दिले. मग काय झाले माहीत नाही. मी थोड्या दिवसात दुसऱ्या जेलमध्ये गेलो पण त्यानी तसा प्रयत्न केला.

ही एक आसक्ति त्यांना होती आणखी काही आसक्ति नव्हती. ते दुःख करीत होते की ही आसक्ति सुटत नाही. मी त्यांना म्हटले की आणखी काही आसक्ति तुम्हाला होती का? तर ते म्हणाले, नाही. मग नंतर मी त्यांना सांगितले की ही आसक्ति तुम्हाला नसती तर तुम्हाला अहंकार झाला असता. तेव्हा परमेश्वराने अहंकार सोडवण्यासाठी ही आसक्ति ठेवली तेव्हा तुम्ही क्लेश करू नका. फार निर्मळ हृदय होते त्यांचे.

### माझ्यातील रजोगुण व बाबासाहेब

माझे शरीर फार दुर्बल झाले तेव्हा मी पवनारला आहाराचे प्रयोग करीत होतो. खिचडी, दही आणि जवसाचे तेल खाण्याचा प्रयोग चालविला होता. एक दीड छटाक तेल घेत असे. पुढे माझे वजन वाढले व आरोग्य सुधारले. एक दिवस बाबासाहेब मला भेटायला आले (अश्रू) ते मला म्हणाले की विनोबा, तुमचे आरोग्य सुधारलेले दिसते पण चेहऱ्यात रजोगुण दिसतो. पूर्वी सत्वगुण दिसत असे. तसा आता दिसत नाही. मग त्यांनी विचारले की तुम्ही काय खाता? मी माझा आहार सांगितला. तेव्हा ते म्हणाले आता तुमचे वजन वाढले आहे तेव्हा असे करा की जवसाचे तेल खाण्याचे सोडून द्या. त्यानेच रजोगुण वाढला. त्यानंतर मी तेल खाण्याचे सोडून दिले (अश्रू)

मी हे एवढ्यासाठी सांगतो आहे की त्यांची माझी किती गाढ मैत्री होती, त्याचे निदर्शन तुम्हाला मिळावे. तर पुष्कळ वेळा त्यांच्याशी चर्चा चाले की स्वराज्यानंतर काय करावे लागेल. तेव्हा ते म्हणाले की जमिनी वाटाव्या लागतील. खादी वगैरेचे काम ठीक आहे पण जमिनी वाटल्याशिवाय खादीच्या कामाला जोर येणार नाही. साहित्याची त्यांना आवड होती. ज्ञानेश्वर वगैरे त्यानी वाचले होते. बंगाली भाषेचा त्यांचा अभ्यास होता. ते बंगाली वाचीत आणि चांगली वचन एकत्र करीत. काही मला पाठवित. त्यांचे वय माझ्यापेक्षा मोठे होते. पण कोणत्याहि प्रकारचा अहंकार त्यांच्या ठिकाणी नव्हता. त्यांनी जेव्हा जमिनी वाटायला सांगितले तेव्हा मी म्हटले की माझेहि तेच मत आहे. मग मी सांगितले की १९३२ साली धुळ्याला जेलमध्ये माझ्या साने गुरूजीशी गोष्टी होत होत्या. गुरूजींनी प्रश्न काढला की स्वराज्यानंतर काय करायचे? मी म्हटले की जमीन वाटली गेली पाहिजे त्याशिवाय भारताचे हृदय एक होणार नाही. साने गुरूजींना ते पटले आणि त्यांनी माझ्या आठवणी लिहल्या त्यात ही गोष्ट लिहीली. मग पुढे लूईफिशरने गांधीजींची भेट घेतली. आम्ही त्यावेळी जेलमध्ये होतो. गांधीजींनी त्यांना सांगितले की स्वराज्यानंतर पहिला प्रश्न जमिनीचा घेतला जाईल आणि त्या वाटल्या जातील. गांधीजी म्हणायचे आधीच बाबासाहेबानी सांगितले आणि साने गुरुजीशी गोष्ट झाली होती तिही पहिली झाली होती. लूईफिशरची गोष्ट मागून झाली होती.

### शेती आनंदाचे साधन

बाबासाहेबांची बुद्धि फार सूक्ष्म होती आज बाबासाहेब असते तर काय करते माहीत नाही त्यांना आध्यात्मिक आवड होती. ते सांगत असत की मी शेतात काम करतो आणि कमी एकांतात बसतो तेव्हा माझी समाधी लागते. झाडाशी बोलणे होते. पाणी झुळझुळ वाहतांना पाहतो. तर फार आनंद होतो. म्हणून प्रत्येक माणसाला थोडी थोडी जमीन हवी. म्हणजे जीवनात आनंद येईल. या गांवीहि मी एकदा आलो होतो आता दुसऱ्यांदा आलो. ग्रामदानाच्या कामाला येथे आरंभ झाला आहे ही चांगली गोष्ट आहे.

### फुटीमुळे भारत गुलाम झाला

आता प्रश्न येतो की वाद उत्पन्न झाला तर कसे वागायचे तर, सर्वेशाम् अविरोधेन. अविरोध साधावा दोन्ही बाजूना समान अंश असतात त्यांचा समेट करावा आणि विरोध टाळावा अशी आमची नीति आहे म्हणून तुकारामाने म्हटले आहे." विरोधाचे मज नसाहे वचन "सर्व खेळीमेळीने

www.vinoba.in

एकमेकाशी सहकार करू. चुका सर्वांच्या हातून होतात त्या सहन करीत जाऊ आणि एकमेकाना चांगले प्रेमाने वागवीत जाऊ असा हसत खेळत संसार करू. आणि "अवघाचि संसार सुखाचा करीन, आनंदे भरीन तिन्ही लोक" ज्ञानदेवांचे हेवाक्य आहे. तो मोका आम्हाला मिळाला. दोन तीन हजार वर्षात भारताला असा मोका मिळाला नव्हता सर्व भारत एक झाले–पश्चिमेपासून उत्तरेपर्यंत. हिंदुस्तानात शेकडो राज्ये होती आणि त्यांची आपसात युद्ध होत. इंग्रज लोक येथे आले. भारतात त्यांचा प्रवेश सोपा झाला कारण येथे सर्व राजे एकमेकांच्या विरोधी होते. तेव्हा कधी ह्यांना मदत कर, कधी त्याना मदत कर, असे करून त्यांनी भारतात प्रवेश मिळविला त्यासाठी त्याना कांही त्रास झाला नाही.

### भारताला पुन्हा नव्याने संधी

आता अशोकानंतर इतक्या वर्षांनी भारत एक झाला. त्याचा एक तुकडा पाकिस्तानच्या रूपाने अलग पडला पण मला आशा आहे की हे दोन्ही तुकडे एकहृदय होतील. एक राज्य करण्याचे कारण नाही पण एकहृदय होतील. अशोकानंतर हा पहिलाच प्रयोग आहे की सबंध राष्ट्राला आपण एक करू शकतो आणि जे सामर्थ्य अशोकाला नव्हते ते सामर्थ्य आम्हाला आहे कारण हे विज्ञान युग आहे. या युगात आम्ही काहीहि करू शकतो. आमचे भूदान ग्रामदान चालते त्याचा प्रचार आज परदेशातहि झाला आहे. अशोकाच्या काळात इतका प्रचार होऊ शकला नसता. पण आज विज्ञानामुळे सर्व विश्व एक झाले आहे म्हणून भारताने एक विचार रूढ केला तर तो संबंध विश्वात पसरवता येईल जसा विश्वाचा विचार भारतात येतो तसा आणि मनु महाराजानी जसे म्हटले आहे,

**पृथिव्याम् सर्वमानवः**

"भारताशी सर्व लोक शिक्षण घेतील. भारत सबंध विश्वाला सुटकेचा रास्ता दाखवू शकतो.

पूर्वी आम्ही शाळेत शिकत होतो तेव्हा शाळेत एक नकाशा असे त्यात एवढा मोठा भारत दाखविला असे व खाली छोटेसे इंग्लंड दाखवित असत म्हणजे एवढेसे इंग्लंड एवढ्या मोठ्या भारतावर राज्य करते आपला देश परतंत्र आहे ह्या गोष्टीचे लहानपणी आम्हाला फार वाईट वाटे. दुसऱ्याचे देशाला ऐकावे लागते हे चित्ताला सहन होत नसे. त्यावेळी ज्या ज्या लोकांच्या कारणामुळे हिंदुस्तानचे नांव उज्वल झाले त्या लोकांची नांवे आम्हाला रामनामासारखी वाटत. एक तीस वर्षाचा पोरगा उठला आणि अमेरिकेत इंग्लीशमध्ये व्याख्यान देऊन आला आणि सबंध जगांत त्याची ख्याती झाली. त्याने जगापुढे मांडले की हिंदुस्तानात सभ्यता आहे आणि जगाला काही देण्यासारखे त्याच्याजवळ आहे. रविंद्रनाथांनी कविता लिहल्या आणि सबंध जगभर त्या कविता पसरल्या. ह्यामुळे आम्हाला मुठभर मांस चढत असे. लोकमान्यांनी कोर्टाला बजावले की, तुम्ही मला सजा करता पण ह्या कोर्टाच्यावर एक दुसरे कोर्ट आहे अगदी येशू ख्रिस्तासारखे ते बोलते. येशू ख्रिस्ताला जेव्हा कोर्टाने म्हटले की आम्ही तुला प्रश्न विचारतो शेवटची गोष्ट करीत आहे तू तू पण तर उत्तरहि देत नाही. तुला समजत नाही का की तुला सूळावर चढविण्याची सत्ता मला आहे. न्यायाधिशाने असे विचारले. त्यावर येशू म्हणाला की माझ्यावर तुझी अथवा कोणाची सत्ता नाही. ईश्वराने जेवढी सत्ता ठेवली असेल तेवढी तुझ्याठिकाणी असेल म्हणजे मी ईश्वराच्या हातात आहे आणि तुला सत्ता आली असेल तीहि ईश्वराचीच आहे स्वतंत्र आणखी सत्ता नाही. तेच टिळकांनी सांगितले. की ह्यापेक्षा मोठे कोर्ट आहे आणि त्यात मी निर्दोष आहे. मला स्वराज्याची गरज आहे. हे मी सांगितले तो अपराध आहे असे मी मानीत नाही लोकमान्यांनी असे सांगितले आणि आम्हाला हिंमत आली असा तो काळ होता.

### ग्रामस्वराज्याने स्वराज्य मजबूत होईल

आता असा काळ आला आहे की भारताने करायची वेळ आली आहे. म्हणून स्वराज्यानंतर ग्रामस्वराज्याची स्थापना केली तर हिंदुस्तानचे स्वराज्य मजबूत होईल आणि कोणत्याहि देशाची वाकडी नजर भारतावर जाऊ शकणार नाही. ह्याने चीनचे आक्रमण मोडेल, उलट प्रेमाने दारिद्रय निवारण केलेले पाहून तुमच्यापासून धडे गिरविण्यासाठी चीन आपले प्रतिनिधि पाठविल तोहि भारतासारखाच गरीब देश आहे. चीनवर परिणाम झाला म्हणजे जगावरहि त्याचा परिणाम होईल. जगात शांति येईल. येवढी आशा मला ह्या कामापासून आहे. एक दिवस मी निघून जाईन, तेव्हा तुम्ही काय मला व्यासासारखे म्हणायला लावाल ?

### धर्मानेच अर्थ व काम प्राप्ति

व्यास महाराज सारे भारत सांगून म्हणतात, "अरे, तुम्ही माझे कां ऐकत नाही रे ? मी तुम्हाला धर्म सांगतो. तुम्हाला काम आणि अर्थ हवा असतो. अर्थ आणि काम दोन्ही धर्मानेच प्राप्ति होतील मग तुम्ही धर्माचरण कां करत नाही ? असे व्यास तळमळून बोलत आहेत. भारताच्या अंती (अश्रू) व्यासापेक्षा अधिक हितकर्ता भारताला कोण लाभणार ? ज्ञानदेव महाराज वर्णन करतात,

### "व्यासाचा हा थोर विश्वाशी झाला उपकार"

ते शेवटी सबंध भारत लिहून "माझे का ऐकत नाही रे" असे म्हणून गेले तसा मीहि जाईन. तेव्हा हे जे सर्व भव्य दर्शन आहे ते माझ्या कल्पना सृष्टीत आहे ते सत्य सृष्टीत आणायचे तुम्ही कराल तर ते होईल.

ह्या गावात मी काय सांगू ? हे गाव तर ग्रामदान व्हावच पण ह्या गावाने सगळ्या वर्धा जिल्ह्याला नेतृत्व द्याव. भिन्न भिन्न मत असणारे लोकांनी ग्रामदान पत्रावर येथे सह्या केलेल्या आहेत हा बाबासाहेबांचा महिमा आहे. हे गाव ग्रामदान होऊन येथे ग्रामस्वराज्याची स्थापना झाली तर बाबासाहेबांना अत्यत आनंद होईल.

विरूळ–१२-५-६४<br>
प्रातः प्रवचन

## आर्वी तालुका ग्रामदान शिबिर

**ता. २३ मे वडाळा**

**ता. २४ मे आर्वी**

आर्वी तालुक्यात आतापर्यंत २४ गावे ग्रामदानात मिळाली खादी केंद्राचे गाव सोरटा, एम्. एल्. ए. चे गाव नांदोरा ही गावेहि ग्रामदानात आली आहेत व जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्षाचे गाव विरुळ हेहि ग्रामदान झाल्यासारखेच आहे.

विनोबांनी आर्वी तालुक्याचे दानाचे आवाहन केले. कारंजा व आर्वी पंचायत समितीचे अध्यक्ष, कलेक्टर, एस. डी. ओ. बी. डी. ओ., एम्. एल्. ए. जिल्हा परिषदेचे सदस्य ह्यांनी त्यासाठी ता. २३ मे ते २९ मे पर्यंत ग्रामदान सप्ताह पाळण्याचा निर्णय घेतला आहे.

विनोबांनी शिक्षक, व्यापारी, वकील पटवारी, राजकीय पक्षाचे लोक ह्या सर्वांना एक महिना ह्या कामासाठी देण्याचे आवाहन केले आहे. स्वतः विनोबांनी १२ जून पर्यंतचा वेळ ह्या तहसिलीत देण्याचा निर्णय घेतला आहे.

तेव्हा मोठ्या प्रमाणावर पदयात्रा ठिकठिकाणी काढून सर्व तहसीलदानाच्या दृष्टीने प्रयत्न होणार आहेत. त्यासाठी ता. २३ मे ला वडाळा येथे शिबिर होईल. व ता. २४ मे रोजी आर्वीला शिबिर होईल. वर्धा जिल्हा व तमाम महाराष्ट्रातील कार्यकर्ते ह्या शिबिरात घेऊन तहसीलदानासाठी बाहेर पडतील अशी त्यांच्याकडून अपेक्षा आहे तरी सर्वांनी तत्परतेने ह्या कामासाठी धावून यावे.

आर्वी शहरात कॉटन मार्केटमध्ये कार्यालय उघडण्यात आले आहे. तेथे अधिक माहितीसाठी चौकशी करावी.

–ठाकुरदास बंग<br>
मंत्री, विनोबा स्वागत समिति

## शाहीर चव्हाणांचे कलापथक

वर्धा जिल्हयात प्रचार कार्य करण्यासाठी शाहीर चव्हाण व त्यांच्या पत्नी सौ. इंदुताई चव्हाण ठिकठिकाणी फिरत आहेत आतापर्यंत त्यांनी विनोबांच्या पडावाच्या गावी जाऊन तेथे कार्यक्रम करून लोकजागृतीचे काम फार मोठ्या प्रमाणावर केले आहे. खेड्यात शेकडो व शहरात हजारो लोक त्यांचा कार्यक्रम पाहून प्रभावित होतात त्यांच्या सोबत सेवाग्रामच्या नई तालीम विद्यालयाचे विद्यार्थी पण फिरत असतात.

सध्या त्यांचा कार्यक्रम आर्वी तालुक्यात होत आहेत.

## विनोबांचा पदयात्रा कार्यक्रम

ता. १६ मे कौंडिण्यपूर<br>
" १७ मे वरखेड<br>
" १८ " भिष्णूर<br>
" १९ " सिरसोली<br>
" २० " आष्टी<br>
" २१ " अंतोरा<br>
" २२ " नांदोरा<br>
" २३ " वडाळा<br>
" २४ " लोणी जि. अमरावती<br>
" २५ " साहूर त. आर्वी जि. वर्धा<br>
" २६ " तारासावंगा "<br>
" २७ " माणिकवाडा "<br>
" २८ " सुमुंद्रा "<br>
" २९ " नारा "<br>
" ३० " बोटीणा "<br>
" ३१ " किन्हाळा "

## विनोबांच्या आर्वी पडावावर

सकाळी दोन हजार लोकासमोर विनोबांचे प्रवचन झाले.

त्यानंतर दुपारी ११ ते १२ पर्यंत जिल्हापरिषदेचे सदस्य, एम्. एल. ए. श्री. काळे पंचायत समित्यांचे अध्यक्ष, कलेक्टर, एस. डी. ओ. रेवेन्यू अधिकारी व कार्यकर्ते ह्यांची संयुक्त बैठक विनोबांचे सोबत होऊन आर्वी तालुकादानाच्या दृष्टीने ता. २३ ते २९ मे पर्यंत सप्ताह पाळण्याचा कार्यक्रम आखण्यांत आला.

दुपारी चार ते पांच पर्यंत आर्वी तालुक्यांच्या हितासाठी काम करणाऱ्या शेतकरी सहकारी संघाच्या कार्यकर्त्यासमोर व प्रतिष्ठित नागरिका समोर विनोबाजी बोलले. ह्यावेळी त्यांनी तालुका दानाचे आवाहन केले.

नंतर सायंकाळच्या प्रार्थना प्रवचनातहि आर्वी तालुका दानासाठी कार्यकर्ते, व्यापारी, वकील, डॉक्टर, सरकारी अधिकारी शिक्षक व प्रोफेसरांना विनोबांनी आव्हान केले.

संपादक : श्री. गोपाळराव काळे, श्री. वसंतराव बोंबटकर,<br>
प्रकाशक : श्री. वसंतराव बोंबटकर<br>
मुद्रक : श्री. वामनराव पाचपांडे, नई तालीम मुद्रणालय, सेवाग्राम.<br>
स्वामित्व : महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, मुंबई.

साम्ययोग : दैनिक पुरवणी ता.१८-५-६४ अं. ६१ र. नं. एन्. २९५<br>
**विनोबा वार्ता**, सेवाग्राम जि. वर्धा (महाराष्ट्र राज्य)<br>
श्री. ______________________

www.vinoba.in